



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : ३४६ ● पुणे ● शुक्रवार, दि. २५ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



महायुतीचे शेखर निकम सोमवारी उमेदवारी... 3



वसंत मोरेंचा पुढचा प्लॅन ठरला 4

## मोठे शक्ती प्रदर्शन करत अशोक पवार यांनी उमेदवारी अर्ज केला दाखल



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अशोक रावसाहेब पवार यांनी मोठे शक्तीप्रदर्शन करत शिरूर विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी संगीता राजापूरकर व सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.खासदार डॉ. अमोल कोल्हे, खासदार निलेश लंके व शिवसेना माजी जिल्हा प्रमुख संजय सातव यांच्यासह हजारो नागरिकांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

शिरूर बाजार समिती आवारातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोठे शक्तीप्रदर्शन करत शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून शहरातील प्रमुख रस्त्यावरून मिरवणुकीत काढण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी व मोठ्या संख्येने उपस्थित होते

शिरूर येथे भव्य रॅलीने शक्तीप्रदर्शनात महिला, तरुण, पुरुष , वृद्ध असे अनेक नागरिक या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

तसेच यावेळी महाविकास आघाडीचा विजय असो शरद पवार जिंदाबाद, उद्धव बाळासाहेब ठाकरे जिंदाबाद, राहुल गांधी जिंदाबाद अशा घोषणा कार्यकर्त्यांकडून देण्यात आल्या.

यावेळी बोलताना अॅड . अशोक पवार म्हणाले की, शिरूर हवेली मतदार संघातून शिरूर हवेलीच्या मतदारांच्या व सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांच्या आशीर्वादाने मला उमेदवारी भेटली असून शिरूर तालुक्यासह हवेली तालुक्याचा विकास हे एकमेव ध्येय आम्ही कायम ठेवत आहे. समोरील महायुतीचे उमेदवार अद्याप जाहीर झाले नाही, कारण त्यांच्याकडे उमेदवार नसून ते आता एक आयात उमेदवार घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. समोरचा उमेदवार कोणी असो, मी केलेली विकास कामे सर्वसामान्य मतदार शेतकरी, कामगार महिलावर्ग यांचा आशीर्वाद घेऊन या निवडणुकीमध्ये उतरलो आहे. असे पवार यांनी सांगितले.



## दिवेघाटात दरड कोसळली

### सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**फुरसुंगी (दै. आरंभ पर्व)**

दिवेघाटात गुरुवारी सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास दरड कोसळण्याचा प्रकार घडला. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. घाट परिसरात पडत असलेल्या पावसाने डोंगरावरील झरे चालू असून माती घसरडी झाली आहे. वडकीवरून सासवडच्या दिशेने जाताना तिसऱ्या वळणावर गुरुवारी अचानक दरड कोसळण्याचा प्रकार घडला. सुरक्षा म्हणून डोंगराच्या बाजूने चार खणण्यात आली आहे. मात्र कोसळणारी दरड मोठी असल्याने ती रस्त्यावर आली आणि एका बाजूचा रस्ता बंद झाला. त्यामधील छोटे दगड प्रवाश्याकडून बाजूला करण्यात आले. मोठा दगड बाजूला करणे अश्यक्य असल्याने त्यासाठी प्रशासनाची वाट पाहावी लागली.

रस्त्यावर आलेल्या दगडांमुळे वाहतुकीस रस्ता कमी उपलब्ध होऊन एका बाजूने वाहतूक चालू ठेवण्यात आल्याने घाटात वाहतूक संथ होऊन दोन्ही बाजूला एक किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या. घाट परिसरात पाऊस जास्त झाल्याने दरड कोसळत आहेत. येथे येणाऱ्या पर्यटकांनी आणि प्रवाश्यानी घाटातून प्रवास करताना सतर्क राहावे, असे येथील स्थानिक नागरिक प्रवीण मोडक यांनी सांगितले.

## हडपसरमध्येही शरद पवार विरुद्ध अजित पवार

### राष्ट्रवादीकडून प्रशांत जगतापांना उमेदवारी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने चेतन तुपे यांना उमेदवारी दिली, तर मनसेने शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांना संधी दिली. महाविकास आघाडीमध्ये मात्र या जागेवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष की शिवसेनेचा ठाकरे गट यांच्यामध्ये रस्सीखेच सुरू होती. अखेर या जागेचा तिढा सुटला आहे. माजी महापौर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे हडपसरमध्येहीशरद पवार विरुद्ध अजित पवार लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

हडपसर विधानसभा मतदार संघाची जागा उद्धव ठाकरे गटाने मागितली होती. त्यावरून रस्सीखेचही सुरु झाली होती. मात्र अखेर जागेचा तिढा सुटून शरद पवार गटाला ही जागा मिळाली आहे. या विधानसभेच्या रणधुमाळीत जगतापांना उतरण्याची संधी मिळाली. पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली. त्यामध्ये 2009 मध्ये हडपसर मतदारसंघ तयार झाला. या मतदारसंघात 2009 मध्ये शिवसेनेचे महादेव बाबर निवडून आले होते. त्यानंतर, 2014 मध्ये भाजपचे योगेश टिळेकर आमदार झाले. 2019 मध्ये टिळेकरांचा पराभव करत राष्ट्रवादीचे चेतन तुपे आमदार झाले. त्यामुळे या मतदारसंघात सातत्याने बदल झाल्याचे दिसत आहे.

मागच्या निवडणुकीत राष्ट्रवादीने हडपसरमधून विजय मिळवला होता. आगामी निवडणुकीत मात्र 2 राष्ट्रवादीतच निवडणूक होणार आहे. त्यामुळे मतदार कोणाला आमदार होण्याची संधी देणार हे पाहणं औत्सुक्याचे ठरणार आहे. अशातच मनसेने यावेळी हडपसरला उमेदवार दिला आहे. त्यामुळे ही लढत तिरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




## चंद्रकांत पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल



'केंद्र सरकार, राज्य सरकारने केलेली कामे आणि चंद्रकांत पाटील यांनी गेले पाच वर्ष कोथरूडमध्ये केलेल्या कामाच्या जोरावर त्यांचा विजय निश्‍चित आहे. लोकसभा निवडणुकीत कोथरूडमध्ये ७५ हजाराचे मताधिक्य होते, त्यामध्ये चंद्रकांत पाटील आणखी २५ हजाराच्या मताधिक्याची भर घालतील.'

- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री

माझा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आज महायुतीचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. मी हवेत जाणारा नाही तर जमिनीवर राहून काम करणारा नेता आहे. उमेदवारी जाहीर झाल्यापासून फिरत आहे. लोकसभेला कोथरूडमध्ये जेवढे मताधिक्य मिळाले त्यापेक्षा जास्त मताधिक्य मिळेल. गेले पाच वर्ष मी कायम नागरिकांना भेटत होतो, त्यांच्यासाठी कायम उपलब्ध आहे. महायुतीला जिंकविण्यासाठी देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे दिवसाचे २२ तास काम करत आहेत, त्यामुळे पण प्रवास करणार, कोथरूडमध्ये अडकून पडणार नाही, राज्यभर प्रचार करणार.'

- चंद्रकांत पाटील, भाजप उमेदवार, कोथरूड विधानसभा मतदारसंघ

**पुणे (दै. आरंभ पर्व) :** कोथरूड विधानसभा मतदारसंघातून भाजप महायुतीतर्फे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आज (ता. 24) त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होतेच, पण शहराच्या अन्य भागातील भाजपचे कार्यकर्ते, माजी नगरसेवक देखील सहभागी होते. चंद्रकांत पाटील यांनी आज सकाळी शंकर महाराज मठ, कसबा गणपतीचे दर्शन घेतले. मोतीबाग कार्यालयाला भेट दिली. तसेच छत्रपती संभाजी महाराज पुतळा, स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा, कर्वे पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर कोथरुड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर मिरवणुकीला सुरुवात केली.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार डॉ. प्रा. मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, शिवसेनेचे शहर प्रमुख नाना भानगिरे आदी उपस्थित होते. 'के फॉर कोथरुड, के फॉर कमळ', 'साधा माणूस, दादा माणूस', कोथरुडकरांचा एकच वादा, पुन्हा चंद्रकांत दादा' असे फलक घेऊन अनेक तरुण सहभागी झाले होते. तसेच महिला, ज्येष्ठ नागरिकही या मिरवणुकीत भगवी टोपी, भाजपचे उपरणे घालून सहभागी झाले होते. कर्वे पुतळा, मृत्यूंजय मंदिर चौक, करिष्मा सोसायटी चौक, पौड फाटा, नळ स्टॉप यासह अन्य ठिकाणी भाजप पदाधिकाऱ्यांनी व माजी नगरसेवकांनी क्रेनला मोठा हार लावून, फटाके फोडून चंद्रकांत पाटील यांचे जल्लोषात स्वागत केले. कोथरुड गावठाण ते एरंडवणे येथील अनसूयाबाई खिलारे शाळा मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये मोठी गर्दी झाल्याने कर्वे रस्त्यावर काही प्रमाणात वाहतूक कोंडीही निर्माण झाली होती.





# नकली बटाटा



कॉर्पोरेट क्षेत्रानं दिलेला 'मल्टीटास्किंग' हा शब्द सध्या चांगलाच रुळलाय. शब्द फार जुना नसला, तरी त्याला अभिप्रेत असलेली प्रक्रिया खूप जुनी आहे. अर्थशास्त्रात सांगितलेल्या श्रमविभागणीच्या तत्त्वाच्या अगदी उलट असा हा नवा सिद्धान्त. एकाच व्यक्तीने अनेकविध कामं तितक्याच कुशलतेने करणं, असा त्याचा साधासरळ अर्थ. वास्तविक, छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वोत्तम 'मल्टीटास्किंग' केलं होतं. शिवारात नांगर चालवणारा शेतकरी युद्धाच्या वेळी हातात तलवार घेऊन रणांगणात उतरत असे. आजही शेतकरी नांगरणीपासून पिकाच्या कापणीपर्यंत सगळी कामं स्वतःच करतो. सर्वसामान्य गृहिणीसुद्धा गरजेप्रमाणं 'मल्टीटास्किंग' करतच असते. स्वयंपाकघरात तिच्या मदतीला धावून येणारा 'मल्टीटास्कर' म्हणजे बटाटा! बटाट्याची भाजी अनेक प्रकारे करता येते. उपवासाला बटाटा चालतो. बटाटामिश्रित खिचडी आणि भाजीबरोबरच चिप्स आणि चिवडाही उपवासाला चवीने खाल्ला जातो. ऐनवेळी पाहुणे आले आणि भाजी कमी असेल तर इतर कोणत्याही भाजीत 'भर' म्हणून बटाटा उपयोगी पडतो. बिचारा कुठल्याही भाजीसोबत कुरकूर न करता शिजतो. हॉटेलात गेलं तर मेनूकार्डमध्ये एकट्या पंजाबी रेसिपीजमध्ये दम आलू, आलू मटर, अलू गोभी, आलू करी, आलू पराठे असे असंख्य पदार्थ दिसतात. मंडईत इतर भाज्या आवडीनुसार निवडल्या जात असल्या तरी बटाटे घेतल्याशिवाय कुणी घरी येत नाही. बटाटा घेताना इ्गार चिकित्सा केली जात नाही; पण आता ती करावी लागणारआहे. बाजारात बटाटासुद्धा बनावट येऊ लागला, तर निर्धास्तपणे खरेदी करण्याजोगं उरलंच काय? उत्तर प्रदेशतल्या बलियामध्ये पांढऱ्या बटाट्यावर लाल रंग चढवून जास्त भावाने विकला जात असल्याचं उघड झालं आणि अनेकांच्या पायाखालची जमीन सरकली. कारण हा बनावट बटाटा आणि त्यावर चढवलेला रसायनयुक्त रंग यामुळं आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो, असं सांगितलं गेलंय. प्रसंगी एखाद्याला या बटाट्यामुळं कर्करोगही होऊ शकतो. अन्नसुरक्षा आणि औषध प्रशासनाने टाकलेल्या छाप्यात असे 21 क्विंटल बटाटे जप्त करण्यात आले. ही बनावटगिरी आता सगळीकडेच बोकाळली आहे. आपण पितो ते दूध सुरक्षित आहे की नाही, हे आपल्याला कळत नाही. धान्यांपासून तेलापर्यंत आणि औषधांपासून इ्गळांपर्यंत बरंच काही बनावट, कृत्रिम आलंय. वेगवेगळ्या फवारण्या करून फळं, भाज्या पिकवणं, सुकलेल्या टवटवीत करणं एवढंच नव्हे तर फळांचा आकार निर्धारित करण्यासाठीही फवारण्या चालल्यात. मंडईत हस्तिदंताएवढा मुळा दिसू लागलाय, जो तिखटच लागत नाही. कोवळ्या काकडीसारखा खाता येतो. केळी तुकतुकीत दिसतात; पण ती नैसर्गिकरीत्या पिकली असतील, याची शाश्वती नाही. या यादीत आता 'मल्टीटास्कर' बटाटाही दाखल झालाय. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, बटाटा घेताना तो लालसर दिसल्यास त्यावर अंगठा घासून पाहावा. कृत्रिम, अनैसर्गिक रंगाचा वापर केला असेल, तर तो रंग हाताला लागतो. याही चाचणीत काही समजलं नाही, तर घरी आणल्याबरोबर बटाटा पाण्यात थोडा वेळ भिजत ठेवावा. त्यानंतर हातानं घासून पाहिल्यास रंग बदलतो. बनावट बटाटा खाल्यास उलट्या, जुलाब, छातीत आणि पोटात जळजळ, तहान, अशक्तपणा अशी लक्षणं जाणवतात. दीर्घकाळ खाल्ल्यास मूत्राशयाचा किंवा फुफुसाचा कर्करोगही होऊ शकतो. किती सहज आणि सार्वत्रिक झालंय जिवाशी खेळणं..!

## महायुतीतील नाराजांचा 'मावळ पॅटर्न'

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या गाजलेल्या 'सांगली पॅटर्न'नंतर आता विधानसभा निवडणुकीत महायुतीत 'मावळ पॅटर्न' उदयास आला आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे उमेदवार सुनील शेळके यांच्याविरोधात अपक्ष निवडणूक लढण्याचे जाहीर केलेल्या 'राष्ट्रवादी'च्याच बापूसाहेब भेगडे यांना मावळ भाजपने पाठिंबा दिला आहे. त्यामुळे या मावळ पॅटर्नचे राज्यभरात महायुतीत कसे पडसाद उमटतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'चे आमदार सुनील शेळके यांना मावळ भाजपचा तीव्र विरोध आहे. शेळके पूर्वी भाजपमध्येच होते. 2019 मध्ये बंडखोरी केल्यापासून शेळके यांना भाजप विरोध वाढला. बालेकिल्ला ताब्यातून गेल्याने भाजपचे प्रदेश नेतेही नाराज होते. परंतु, अजित पवार भाजपसोबत सत्तेत सहभागी झाल्याने मावळमधील भाजप पदाधिकाऱ्यांची कोंडी झाली. दीड वर्षे शांत राहिल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार शेळके यांच्या विरोधात छुपा प्रचार सुरू झाला होता. दुसरीकडे, आमदार शेळके यांना स्वपक्षातूनही विरोध वाढण्यास सुरुवात झाली. पक्षाचे तळेगाव दाभाडेचे शहराध्यक्ष व माजी प्रदेश उपाध्यक्ष बापू भेगडे विरोधात गेले. भेगडे यांनी उमेदवारीवरही दावा केला.

## सुनील टिंगरे यांना वडगाव शेरीमधून उमेदवारी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आज सात उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आपली पहिली यादी जाहीर तेव्हा बंडात साथ देणाऱ्यांना संधी देण्यात आली होती, परंतु यामध्ये अजित पवारांचे विश्वासू समजले जाणारे वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे हे वेटिंग लिस्टवर ठेवण्यात आले होते. अखेर त्यांना दुसऱ्या यादीमध्ये संधी देण्यात आली आहे.

वडगाव शेरीचे विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांना एबी फॉर्म दिल्याची चर्चा होती. मात्र, पहिल्या यादीत त्यांचे नाव जाहीर न झाल्याने आता चर्चांना उधाण आले होते. पुण्यातील पोर्शे कार हिट ॲण्ड रन प्रकरणात सुनील टिंगरे यांनी आरोपीला मदत केली असल्याचा आरोप झाला होता. तसेच वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघावरुन वाद सुरू असल्याची माहिती समोर आली होती. भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून दावा करण्यात आला होता.

वडगाव शेरी विधानसभेचा वाद दिल्ली दरबारी सुद्धा गेला होता. अखेर वडगाव शेरी मतदार संघातून विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांना संधी देण्यात आली आहे.

सुनील तटकरे यांनी अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये दुसऱ्या यादीची घोषणा केली. इस्लामपूरमधून निशिकांत पाटील यांना उमेदवारी देऊन, जयंत पाटील यांना आव्हान देण्यासाठी अजित पवार यांनी मोठा डाव टाकल्याचे बोललं जात आहे. तासगावमधून संजय काका पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच शिरूर-हवेलीमधून माऊली आबा कटके यांना उमेदवारी देण्यात आली असून त्यांच्या समोर आता महाविकास आघाडीच्या अशोक पवार यांचे आव्हान असणार आहे. आता 7 उमेदवारांची यादी जाहीर झाली आहे. एकूण 45 उमेदवारांची घोषणा आतापर्यंत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आली आहे.

### दुसऱ्या यादीत कुणाला मिळाली उमेदवारी?

वडगाव शेरी : सुनील टिंगरे, वांद्रे पूर्व : झिशान सिद्दीकी, अणूशक्तीनगर : सना मलिक, तासगाव : संजय काका पाटील, इस्लामपूर : निशिकांत पाटील, शिरुर : माऊली कटके, लोहा-कंधार : प्रताप पाटील चिखलीकर

## थोडक्यात



### ससूनमध्ये चार कोटींचा घोटाळा

**पुणे (आरंभ पर्व) :** ससून रुग्णालयाच्या बँक खात्यातून तब्बल चार कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात तेरा आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी हा आदेश दिला. रुग्णालयाच्या वरिष्ठ सहायक रोखपाल सुलक्षणा चाबुकस्वार, कक्षसेवक नीलेश शिंदे, अधिपरिचारिका सुमन वालकोळी, अर्चना अलोटकर, वरिष्ठ लिपिक दीपक वालकोळी, संतोष जोगदंड, दयाराम कछोटिया, कनिष्ठ लिपिक श्रीकांत श्रेष्ठ, सेवानिवृत्त सीटी स्कॅन तंत्रज्ञ उत्तम जाधव, वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक संदीप खरात, तसेच अनिता शिंदे, शेखर कोलार, राखी शहा या व्यक्तींचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे.

### अकरा विमानात बॉम्ब ठेवल्याच्या ट्विटमुळे एकच खळबळ

**पुणे (आरंभ पर्व) :** अकासा एअर कंपनीच्या अकरा विमानांमध्ये बॉम्ब ठेवल्याचे ट्विट करून धमकावल्या प्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यात ट्विटर हॅन्डल चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'ॲट लुकासनतुली 2271' या ट्विटर हॅन्डल चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सारथी सर्वानंद पांडे (वय 34, रा. दत्तकृपा सोसायटी, लोहगाव) यांनी विमानळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार अकासा एअरलाईन्सच्या गोवा ते पुणे, दिल्ली ते पुणे आणि पुणे ते कोलकाता प्रवासादरम्यान 22 ऑक्टोबर रोजी घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. दाखल गुन्ह्यानुसार लुकासातुली या ट्विटर हॅन्डलवरून अकासा एअरलाईन्स या अधिकृत ट्विटर हॅण्डलवर संदेश पाठविण्यात आला. त्यामध्ये 'दहशतवादी लुकास आणि तुलीप यांनी तुमच्या अकरा फ्लाईटमध्ये बॉम्ब ठेवला' असल्याचा खळबळजनक संदेश होता. त्यानंतर विमानतळ प्रशासन तसेच कंपनीच्या वतीने सर्वत्र तपासणी केली. दरम्यान, हा खोडासाळपणे कोणी तरी अफवा पसरविण्यासाठी केल्याचे समोर आले. दरम्यान ज्या ट्विटर हॅन्डलवरून हा संदेश पाठविण्यात आला त्या विरोधात अफवा पसरवून भीतीदायक वातावरण निर्माण करून विमानातळावरील प्रवाशांच्या आणि कंपनीच्या कामगारांच्या जीवीतास धोका निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिरूर-हवेलीमध्ये महायुतीकडून माऊली आबा कटके यांना उमेदवारी जाहीर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आज दुसरी यादी जाहीर केली आहे. शिरूर-हवेलीमध्ये महायुतीकडून माऊली आबा कटके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. माऊली आबा कटके यांच्या समोर महाविकास आघाडीच्या अशोक पवार यांचे आव्हान असणार आहे. तसेच सुनील टिंगरे, काका पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. सुनील तटकरे यांनी अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये दुसऱ्या यादीची घोषणा केली. इस्लामपूरमध्ये जयंत पाटील यांना घेरण्यासाठी अजित पवार यांनी मोठा डाव टाकला आहे. अजित पवार यांनी निशिकांत पाटील यांना उमेदवारी दिली आहे. आता 7 उमेदवारांची यादी जाहीर झाली. एकूण 45 उमेदवारांची घोषणा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून आतापर्यंत करण्यात आली आहे.

## कुख्यात लिमन ऊर्फ मामा टोळीतील दोघे सराईत अटकेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कंबरेला पिस्तूल लावून फिरणाऱ्या सराईतासह त्याच्या साथीदाराला सिंहगड रोड पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून एक पिस्तूल, तीन काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. अटक करण्यात आलेले आरोपी हे सराईत गुन्हेगार असून कुख्यात गुंड चेतन लिमन उर्फ मामा टोळीतील असल्याचे समोर आले आहे. सूरज महेंद्र नांगरे (21) आणि साहील मनीष सोनवणे (22, रा. दोघे. किरकटवाडी, हवेली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. वडगाव येथील कॅनॉल रोडजवळ ही कारवाई करण्यात आली. सिंहगड रोड पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक सुरेश जायभाय, अंमलदार तानाजी सागर, दत्ता मालुसरे, धनंजय गिरिगोसवी यांचे पथक हद्दीत गस्तीवर होते. यादरम्यान कॅनॉल रोडजवळ दोघे संशयित थांबल्याची माहिती अंमलदार सागर यांना मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता नांगरे याच्या कंबरेला पिस्तूल आढळून आले. तर, सोनवणे याच्याकडे दोन काडतुसे मिळून आली.

- एक पिस्तूल, तीन काडतुसे जप्त

# आठव्या आंतरराष्ट्रीय डेअरी व पशुखाद्य प्रदर्शनाचे उद्घाटन

## शनिवारपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार; दूध उत्पादक शेतकरी, पोल्ट्री व्यावसायिकांना प्रगतीची संधी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डेअरी, पोल्ट्री, मत्स्यपालन, पशुखाद्य व्यावसायिक आणि शेतकऱ्यांसाठी आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय डेअरी व पशुखाद्य प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवारी झाले. बेनिसन मीडियाच्या पुढाकारातून ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटर, पिंपरी पुणे येथे होत असलेले हे प्रदर्शन येत्या शनिवारपर्यंत (दि. 26) सकाळी 10 ते संध्याकाळी 6 या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. या प्रदर्शनात जवळपास 100 दूध व दुग्धजन्य उत्पादने आणि यंत्रसामुग्री पुरवणाऱ्या कंपन्यांनी सहभाग घेतला आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद मेश्राम, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे (गोकुळ दूध) चेअरमन अरुण डोंगळे, जाफा कॉम्फीडचे व्यवस्थापकीय संचालक प्रसाद वाघ, द वर्ल्ड व्हेटर्नरी पोल्ट्री असोसिएशनचे डॉ. जितेंद्र वर्मा, पोल्ट्री फार्मर्स अँड ब्रीडर्स असोसिएशनचे वसंतकुमार शेट्टी, कंपाउंड लिव्हस्टॉक मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे चेअरमन दिव्याकुमार गुलाटी, यांच्यासह संयोजक प्राची अरोरा व आनंद गोरड आदी उपस्थित होते. पहिल्याच दिवशी डेअरी व पशुखाद्य निर्मिती व्यावसायिक, शेतकरी युवक, युवतींनी हे प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी केली.

डॉ. मिलिंद मेश्राम म्हणाले, "महाराष्ट्रात दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. दुधाचे उत्पादन व त्यांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी दुभत्या जनावरांचे आरोग्य चांगले ठेवणे गरजेचे असते. जनावरांना चांगला चारा, पौष्टिक पशुखाद्य देण्यासह त्यांच्या आरोग्याची काळजी घेणेही महत्वाचे आहे. त्यामुळे नियमित लसीकरण, गरजेनुसार उपचार व्हायला हवेत."

अरुण डोंगळे म्हणाले, "डेअरी आणि पशुखाद्याची सुरक्षा घेऊन होत असलेले हे प्रदर्शन शेतकरी व शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्यांसाठी उपयुक्त आहे. तंत्रज्ञान वेगाने बदलत असून, डेअरी व्यवसायाला पूरक आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आपण केला पाहिजे. गोकुळने दर्जा जपत संकलन वाढवले आहे. लाखो लिटर दुधाचे संकलन आणि हजारो शेतकरी बांधव गोकुळचे सभासद आहेत."

प्रकाश कुतवळ म्हणाले, "व्यवसायात नावीन्य असणे प्रगतीचे लक्षण आहे. डेअरीत चांगल्या दर्जाचे दूध मिळत नाही. दुधाच्या भेसळीवर चर्चा करण्यापेक्षा त्यावर काम करणे अधिक महत्वाचे आहे. सहकार आणि खासगी अशा दोन शाखा या क्षेत्रात काम करतात. एखादी डेअरी किती दूध संकलित करते, यापेक्षाही त्याचा दर्जा काय, हे जास्त महत्वाचे आहे."

प्राची अरोरा म्हणाल्या, "प्रदर्शनाचे आठवे वर्ष असून, यंदाची संकल्पना 'मिल्क अँड फीड सेफ्टी' अशी आहे. जनावरांचे आरोग्य व आहार व्यवस्थापन, डेअरी प्लांट मशीनरी, दूध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे आधुनिक तंत्रज्ञान, आईस्क्रीम व मिठाई उत्पादन, निर्यातीमधील संधी, पोल्ट्री, मत्स्य व पशुखाद्य मार्केट यावर तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा झाली."

गेल्या सातही प्रदर्शनांमध्ये अत्याधुनिक मशिनरींची प्रात्यक्षिके पाहून व तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन अनेक शेतकऱ्यांनी व ग्रामीण युवक युवतींनी स्वतःचा लघु व मध्यम स्वरूपाचा दुग्धजन्य पदार्थ किंवा पशुखाद्य निर्मिती प्रकल्प उभारून स्वतःच्या ब्रँडनेमने विक्री यंत्रणा सुरू केली आहे, असे आनंद गोरड यांनी नमूद केले.

प्रसाद वाघ यांनी दुधाच्या दर्जेदार उत्पादनात पशुखाद्य कसे महत्वाचे आहे, याविषयी माहिती दिली. वसंतकुमार शेट्टी यांनी पोल्ट्री उद्योगाविषयी आपले विचार मांडले. जयाविजया राव यांनी सूत्रसंचालन केले. अश्वनीकुमार यांनी आभार मानले.

## थोडक्यात



### महायुतीचे शेखर निकम सोमवारी उमेदवारी अर्ज करणार दाखल

**चिपळूण (आरंभ पर्व) :** 265 चिपळूण-संगमेश्वर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार व विद्यमान आमदार शेखर निकम हे आपला उमेदवारी अर्ज लवकरच दाखल करणार असून यावेळी त्यांच्यासोबत महायुतीचे कार्यकर्तें मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सोमवार (दि.28) रोजी स.10:30 वा. आपल्या असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत व आपल्या पक्षाच्या ज्येष्ठ नेतेमंडळींच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा विधानसभेवर निवडून जाण्यासाठी विद्यमान आमदार शेखर निकम आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. आपल्या मतदारसंघातील कोकणवासीयांसाठी आजपर्यंत केलेल्या कामांची पोचपावती म्हणून मतदार पुन्हा एकदा आपल्याला निवडून देतील हा आत्मविश्वास निकम यांना निश्चितच आहे. काहीही झालं तरी कोकणचा विकास केल्याशिवाय राहणार नाही असा प्रणच निकम यांनी केला आहे. मतदारांची साथ आणि कार्यकर्त्यांचा उत्साह या बळावर ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी शेखर निकम सज्ज झाले आहेत. तूर्तास अर्ज दाखल करण्याची निकम यांची पूर्ण तयारी झाली असून लवकरच प्रचाराचे रणशिंग फुंकले जाणार आहे. कार्यकर्तें मात्र आतापासूनच आपल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी कामाला लागल्याचे चित्र दिसून येत आहे.



### पुरंदरमधून संजय जगताप तर कसब्यातून धंगेकर यांना संधी

**चिपळूण (आरंभ पर्व) :** महाविकास आघाडीतल्या शिवसेनेने आणि राष्ट्रवादीने जाहीर केल्यानंतर आता काँग्रेसने यादी जाहीर केली आहे. काँग्रेस पक्षाने नागपूर, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र यातील मतदारसंघांसह एकूण 48 जागा जाहीर केल्या आहेत. आमचं 85-85-85 जागांचं ठरलं आहे असं काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (उद्धव ठाकरे) यांनी बुधवारच्या पत्रकार परिषदेत जाहीर केलं होतं. आता दोन पक्षांनी नावं जाहीर केल्यानंतर काँग्रेसची यादीही जाहीर झाली आहे.

काँग्रेसच्या यादीत कुणाला कुठून संधी?

1) के.सी. पाडवी, अक्कलकुवा 2) राजेंद्र गावित, शहादा 3) किरण दामोदर, नंदुरबार 4) शिरीशकुमार नाईक, नवापूर 5) प्रवीण चौरे, साक्री 6) कुणाल पाटील, धुळे, ग्रामीण 7) धनंजय चौधरी, रावेर 8) राजेश एकाडे, मलकापूर 9) राहुल बोंद्रे, चिखली 10) अमित झनक, रिसोड 11) वीरेंद्र जगताप, धामगाव रेल्वे 12) सुनील देशमुख, अमरावती<br>13) यशोमती ठाकूर, तिवसा 14) अनिरुद्ध देशमुख,अचलपूर 15) रणजीत कांबळे, देवळी 16) प्रफुल्ल गुडधे, नागपूर-दक्षिण पश्चिम 17) बंटी शेळके, नागपूर, मध्य 18) विकास ठाकरे, नागपूर पश्चिम 19) नितीन राऊत, नागपूर उत्तर 20) नाना पटोले, साकोली 21) गोपालदास अग्रवाल, गोंदिया 22) सुभाष धोटे, राजुरा 23) विजय वडेट्टीवार, ब्रह्मपुरी 24) सतीश वारजुकर, चिमूर 25) माधवराव पवार-पाटील, हदगाव 26) तिरुपती कोंडेकर, भोकर 27) मीनल पाटील खदगावकर, नायगाव 28) सुरेश वरपुडकर, पाथरी 29) विलास औताडे, फुलंब्री 30) मुझ्झफर हुसैन, मीरा भाईंदर 31) अस्लम शेख, मालाड-पश्चिम 32) नसीम खान, चांदिवली 33) ज्योती गायकवाड, धारावी 34) अमिन पटेल, मुंबादेवी 35) संजय जगताप, पुरंदर 36) संग्राम थोपटे, भोर 37) रवींद्र धंगेकर, कसबा 38) बाळासाहेब थोरात, संगमनेर 39) प्रभावती घोगरे, शिर्डी 40) धीरज देशमुख, लातूर ग्रामीण 41) अमित देशमुख, लातूर, शहर 42) सिद्धराम मेहेत्रे, अक्कलकोट 43) पृथ्वीराज चव्हाण, कऱ्हाड, दक्षिण 44) ऋतूराज पाटील, कोल्हापूर दक्षिण 45) राहुल पाटील, करवीर 46) राजू आवळे, हातकणंगले 47) विश्वजीत कदम, पलूस कडेगाव 48) विक्रमसिंग सावंत, जत

# सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चला महाराष्ट्रात १२ वे, तर पश्चिम विभागात १८वे स्थान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
इंडियन इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कने (आयआयआरएफ) नुकत्याच प्रकाशित केलेल्या क्रमवारीत सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चला (एससीपीएचआर) महाराष्ट्रात 12 वे, तर पश्चिम विभागात 18 वे स्थान प्राप्त झाले आहे. देशातील फार्मसी महाविद्यालयांच्या यादीत 'सूर्यदत्त'ने चमकदार कामगिरी करत या क्रमवारीत देशात 72 वे स्थान मिळवले आहे.




उद्योग जगतातील तज्ज्ञांकडून या क्रमवारीचे सूक्ष्मपणे मूल्यांकन करण्यात येते. 2024 या वर्षाची क्रमवारी एज्युकेशन पोस्ट मासिकात नुकतीच जाहीर झाली. अध्यापन-अध्ययन व स्रोत, संशोधन, भविष्यवेधी मार्गदर्शन, रिटर्न व इन्व्हेस्टमेंट आणि बाह्यधारणा व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन या पाच मुद्यांवर सर्वेक्षण करून ही क्रमवारी तयार केली जाते.

या क्रमवारीने सूर्यदत्तच्या समर्पित भावनेचा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा गौरव झाला आहे. सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरेच्या मान्यतेने बॅचलर ऑफ फार्मसी (बी. फार्म) आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या मान्यतेने डिप्लोमा इन फार्मसी (डी. फार्म) हे दोन अभ्यासक्रम चालवले जातात. उत्साही विद्यार्थ्यांची या क्षेत्रातील स्वप्ने पूर्ण व्हावीत आणि त्यांना एक चांगले करिअर घडविता यावे, यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या सूर्यदत्तसाठी ही मान्यता प्रोत्साहन आहे. सद्यस्थितीत आरोग्य क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन इथे प्रात्यक्षिक व पाठ्यपुस्तकातील ज्ञान दिले जाते.

सूर्यदत्त कॉलेज फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्च (एससीपीएचआर) औषधनिर्माणशास्त्राच्या क्षेत्रात उच्च दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यास वचनबद्ध आहे. विद्यार्थ्यांना आरोग्य सेवा उद्योगातील विविध भूमिकांसाठी तयार करण्याचे ध्येय संस्थेचे आहे. महाविद्यालयाने औषधनिर्माण पद्धतींना सुधारण्यास आणि रुग्णांच्या देखभालीत सुधारणा करण्यासाठी अभिनव संशोधनाला नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. आधुनिक सुविधा आणि चांगल्या प्रकारे सुसज्ज प्रयोगशाळांसह, 'एससीपीएचआर' विद्यार्थ्यांना सिद्धांतात्मक ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करते. कॅम्पसमध्ये आधुनिक वर्गखोल्या आणि प्रगत सुविधा असल्याने विद्यार्थ्यांना सतत विकसित होणाऱ्या औषधनिर्माण क्षेत्रातील करिअरसाठी मदत होते.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी नामांकित क्रमवारीतील स्थानाबद्दल फार्मसी महाविद्यालयाच्या सर्व टीमचे विशेष अभिनंदन केले. अतिशय महत्वाच्या अशा या क्रमवारीत 'एससीपीएचआर'ला स्थान मिळाल्याचा आनंद आहे. यातून महाविद्यालयाची उत्कृष्टतेबाबत असलेली समर्पित भावना आणि उच्च प्रतीचे फार्मसी प्रोफेशनल घडविण्याचे ध्येय अधोरेखित होते. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचा आलेख असाच उंचवत राहावा. तुम्हाला आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी नमूद केले.



## राष्ट्रवादी काँग्रेसच्या यादीतही घराणेशाहीची झलक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी 45 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यंदा विविध पक्षांनी आपापल्या उमेदवार यादीत घराणेशाहीला थोड्याबहोत प्रमाणात स्थान दिल्याचे दिसत आहे. स्वतःला पार्टी विथ डिफरन्स आणि इतरांना परिवारवादी पक्ष म्हणणाऱ्या भाजपानेही यंदा घराणेशाहीला प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर पुर्वीपासूनच घराणेशाहीचा आरोप होत आला आहे. आज जाहीर केलेल्या यादीतही त्याची प्रचिती आलेली पाहायला मिळाली. राष्ट्रवादीने आपल्या पहिल्या यादीत कर्जत जामखेड मतदारसंघासाठी रोहित पवार, बेलापूरसाठी संदीप नाईक, मुक्ताईनगरसाठी रोहिणी खडसे, अहेरीमधून भाग्यश्री आत्राम, बारामतीसाठी युगेंद्र पवार, पारनेरमध्ये रानी लंके आणि तासगाव-कवठे महांकाळ मतदारसंघात रोहित आर. आर. पाटील यांना उमेदवारी दिली आहे. शरद पवार यांच्या घरातून युगेंद्र पवार यांच्या रूपाने नवीन सदस्य आता निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. याआधी अजित पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार हे राजकारणात सक्रिय आहेत. माजी मंत्री गणेश नाईक यांचे चिरंजीव संदीप नाईक यांनी बंडखोरी करत बेलापूरमधून तुतारीच्या चिन्हावर लढण्याची तयारी केली आहे.

## माहिती सेवा समितीने केली स्वच्छता कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**
जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावा..या उक्तीनुसार माहिती सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांच्या मार्गदर्शनातून व हवेली तालुका अध्यक्ष कमलेश बहिरट यांच्या संकल्पनेतून दरवर्षी प्रमाणे यंदाही वाघोली आणि परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी दिवाळी भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरामध्ये वर्षभर घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा गोळा करून खऱ्या अर्थाने दुसऱ्यांच्या घरामध्ये दिवाळी साजरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सुद्धा दिवाळी साजरी व्हावी या उद्देशाने माहिती सेवा समिती गेल्या अनेक वर्षापासून स्वच्छता कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप करून सन्मान करण्यात आला. यात्प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक पंडित रेजीतवाड यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना परिसराची स्वच्छता करण्याबरोबरच स्वतःची काळजी घेण्याचे आवाहन केले तसेच चंद्रकांत वारघडे यांनी यापुढील काळात कोणती अडचण आल्यास पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले. सर्वांनी हि दिवाळी पर्यावरण पुरक साजरी करण्याचे आव्हान चंद्रकांत वारघडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाचे आयोजक कमलेश बहिरट यांनी त्यांच्या आजोबा विठ्ठल बहिरट यांनी दिलेल्या शिकवणीनुसार मोठ्यांची दिवाळी कायम होत असते गोरगरिबांची दिवाळी साजरी झाली पाहिजे या शिकवणीतून ही परंपरा सुरू ठेवली असल्याचे प्रतिपादन केले. स्वच्छता पुणे सोसायटीच्या पौर्णिमा ओवाळ यांनी कमलेश बहिरट आणि मार्गदर्शक चंद्रकांत वारघडे तसेच माहिती सेवा समितीच्या निमित्ताने आभार मानले.




यात्प्रसंगी वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाघोली पंडित रेजीतवाड साहेब माहिती सेवा समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत गोविंद वारघडे, हवेली तालुका अध्यक्ष कमलेश बहिरट, स्नेहल स्टोन क्रेशर चे श्रीकांत गांधी, पत्रकार ज्ञानेश्वर पाटेकर, पत्रकार परशुराम चव्हाण, पत्रकार महादेव साकोरे, संभाजी चौधरी, उद्योजक गणेश कटके, बालाजी उद्योगसमूह चे किरण जाधवराव, उद्योजक संतोष बहिरट, प्रमोटर्स अँड बिल्डर्स विशाल बहिरट, कैलास बहिरट, विलास बहिरट, उद्योजक रितेश बहिरट, अविष्कार बहिरट, मा.अग्निशामक दल अधिकारी शिवाजीराव चव्हाण, हिंदवी चे पदाधिकारी विलास नवले, ऋषिकेश परदेशी, नितीन माळी, मृत्युंजय ग्रुपचे योगेश बर्डे, सागर जगताप, अशोक तांदळे, सुनील सकट, उद्योजक विक्रम गडदे, गणेश तोरसे, स्वच्छ पुणे सहकारी संस्थेचे शिवाजीराव मोघे, राहुल पाटोळे, पौर्णिमा ओव्हाळ, महिला बचत गट अध्यक्षा वनिता बहिरट, अश्विनी जगताप, वर्षा वाघमारे, आशा बहिरट, ताराबाई बहिरट मंगल बहिरट लिलाबाई बहिरट मीना बहिरट, पूजा बहिरट, कोमल ढेरंगे, वैष्णवी बहिरट, पूजा वीर, मोकमपल्ले मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "मला पाहताच राज ठाकरेंना अश्रू अनावर झाले होते" : मयुरेश वांजळे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
लोकसभेला महायुतीला बिनशर्त पाठिंबा राज ठाकरे यांनी दिला होता. परंतु, आता विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय राज ठाकरे यांनी घेतला आहे. मनसेकडून महाराष्ट्रात ठिकठिकाणी उमेदवार घोषित केले जात आहेत. मनसेकडून पहिल्यांदा 7 उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर



मनसेकडून 45 उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर करण्यात आली. यानंतर मनसेने 13 उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. आतापर्यंत मनसेकडून 65 उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यातच दिवंगत आमदार रमेश वांजळे यांचे सुपुत्र मयुरेश वांजळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. यानंतर प्रतिक्रिया देताना मयुरेश वांजळे यांनी राज ठाकरे यांच्यासंदर्भातील एक भावूक आठवण सांगितली.

खडकवासला मतदारसंघातून मयुरेश वांजळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सन 2009 मध्ये खडकवासला मतदारसंघ निर्माण झाल्यानंतर आमदार रमेश वांजळे यांनी मनसेकडून निवडणूक लढवत विजय मिळवला होता. आमदार असताना रमेश वांजळे यांनी मनसे स्टाइलने अनेक आंदोलने केली. विधिमंडळही चांगलेच गाजवले होते. 2011 मध्ये रमेश वांजळे यांचे निधन झाले. त्यानंतर पोटनिवडणूक पार पडली. त्यावेळी भाजपाने माजी नगरसेवक भीमराव तापकीर यांना उमेदवारी दिली. रमेश वांजळे यांच्या पत्नी हर्षदा वांजळे यांच्याविरोधात तापकीर 3 हजार 625 मतांनी जिंकले. यानंतर खडकवासला मतदारसंघ भाजपाच्या हाती आला. खडकवासला मतदारसंघात भाजपाला मानणारा मोठा मतदार आहे. सन 2011, 2014 आणि 2019 च्या निवडणुकांमध्ये तापकीर सलग विजयी झाले.

उमेदवारीबाबत बोलताना राज ठाकरे काय म्हणाले होते, असा प्रश्न मयुरेश वांजळे यांना विचारण्यात आला. यावर, जसे वाघाचे काम होते, तसेच तुझे काम आहे. तू याच कार्यपद्धतीने पुढे चालत राहा, असे राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरेंना भेटायला गेलो तेव्हा मला पाहताच राज ठाकरेंना अश्रू अनावर झाले, ते म्हणाले मला वाटले माझा रमेशच आला, अशी आठवण मयुरेश वांजळे यांनी सांगितली.

# वाचन म्हणजे जगण्याचा रियाज : ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

### राजगुरू महाविद्यालयात वाचनवाटा उपक्रमाचे आयोजन

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे म्हणजे वाचनालये असून वाचन म्हणजे जगण्याचा रियाज असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचनवाटा उपक्रमांतर्गत दिवाळी अंक वाटप कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, डॉ. बी.डी.अनुसे, प्रा. रौनक भिसे उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, माणसा - माणसातले आणि माणुसकीतील अंतर दिवसेंदिवस वाढत चालले असून माणुसकीचा धर्म जागवण्यासाठी वाचनसंस्कृतीची जोपासना करणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठी विभागाने राबविलेला वाचनवाटा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल त्यांनी समस्त मराठी भाषिकांचे अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. एस एस पिंगळे यांनी वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी विचारांची, पुस्तकांची देवाणघवाण आवश्यक असल्याचे सांगून ज्ञान हे ग्रंथांच्या अभ्यासाने आणि वाचनानेच मिळू शकते असे सांगितले. त्यासाठी वाचनवाटा उपक्रम स्तुत्य असल्याचे ते म्हणाले.

निकिता राठोड या विद्यार्थीनीने प्रार्थना सादर केली. प्रास्ताविकात मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी वाचन संस्कृतीच्या प्रचारासाठी वाचनवाटा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रातिनिधिक स्वरूपात 100 विद्यार्थ्यांना दिवाळी अंकाचे वाटप करण्यात आले. वर्षभरात सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला वाचकवीर पुरस्कार देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी.डी.अनुसे यांनी आभार प्रा. रौनक भिसे यांनी मानले.



# थोडक्यात



## उच्च गुणवत्ता असलेले रायना ज्युसेस आता पुण्यात देखील उपलब्ध

- ताज इंडियन ग्रुपच्यावतीने घोषणा
- जागतिक दर्जाचे उच्च गुणवत्तापूर्ण रायना ज्युसेसचे पुण्यात पदार्पण

**पुणे (आरंभ पर्व) :** सर्वोत्तम फळांपासून बनविलेले ताजे नैसर्गिक पल्प असलेले ताज इंडिया ग्रुपचे 'रायना ज्युसेस' आता पुण्यात देखील उपलब्ध होणार आहेत. युरोपमध्ये निर्यात केलेल्या 'रायना ज्युसेस'ला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादानंतर पुणे आणि मुंबई सह भारतातही पाच मुख्य राज्यांमध्ये रायना ज्युसेस आता उपलब्ध आहेत. उत्तम दर्जाची फळे आणि कोल्ड प्रेस प्रक्रियेमुळे रायना जूस ग्राहकांच्या विशेष पसंतीस उतरत आहेत. पुणेकरांसाठी 'रायना ज्यूस' उपलब्ध करून देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे, अशी भावना ताज इंडियन ग्रुप चे मालक हरप्रीत सिंह यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी गोरत्ना ऑर्गेनिक अँड नॉचरल्स चे मालक योगेश अटल उपस्थित होते. पुण्यातील सहा वितरणकर्त्यांशी 'रायना ज्युसेस' च्या वतीने भागीदारी करण्यात आली आहे. ज्यामुळे ग्राहकांना सहजपणे रायना ज्युसेस उपलब्ध होईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी गौतम कुमार, सेल्स प्रतिनिधी कौस्तुभ गाडे देखील उपस्थित होते. गौतम कुमार म्हणाले, युरोपीय खाद्य मानाकांचे पालन करून 'रायना ज्युसेस' भारतात तयार केले जातात. सर्वोत्तम फळांपासून ताजे नैसर्गिक पल्प ने तयार केलेले हे ज्युसेस आहेत. आमच्या उत्पादनाने युरोपमध्ये चांगली लोकप्रियता मिळवली आहे आणि भारतीय ग्राहकांना तोच अनुभव देण्याचा आमचा उद्देश आहे. रायना ज्यूस चे सेल्स हेड अनिरुद्ध चौधरी म्हणाले, 'रायना ज्युसेस'च्या माध्यमातून आरोग्यदायी आणि उत्कृष्ट दर्जाचे पेय ग्राहकांना उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. आम्ही ताज इंडियन ग्रुपचे आंतरराष्ट्रीय मानांकन असलेले जागतिक दर्जाचे 'रायना ज्युसेस' पुण्यात घेऊन आलो आहोत याचा विशेष आनंद होत आहे. ताज इंडियन ग्रुप भारतीय बाजारपेठेत आपली उत्पादने आणण्याच्या तयारीत आहे. ज्यामध्ये कुकीज, बिस्कीट, रेडी टू इट उत्पादने, नमकीन व ताज इंडिया मसाला यांचा देखील समावेश आहे.

## आयजीएपीने व्यापक अहवाल केला प्रसिद्ध

**पुणे (आरंभ पर्व) :** इंटरनेट गव्हर्नन्स आणि पॉलिसी प्रोजेक्ट (आयजीएपी) ने आज "सोशल मीडिया पारदर्शकता अहवाल: एक कार्यप्रदर्शन आढावा" या शीर्षकाचा आपला नवीनतम अहवाल प्रकाशित केला. या अहवालात महत्त्वाच्या सोशल मीडिया मध्यस्थ भारताच्या माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक व डिजिटल मीडिया नैतिकता कोड) नियम, 2021 च्या अनुपालनाची सखोल समीक्षा केली आहे. अहवालात फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप, यूट्यूब, ट्विटर/एक्स , लिंक्डइन, स्नॅप, शेअरचॅट आणि कू यासारख्या प्रमुख प्लॅटफॉर्मच्या कार्यप्रदर्शनाचे मूल्यांकन केले गेले आहे, ज्यात 2021 च्या जूनपासून 2023 च्या डिसेंबरपर्यंत त्यांच्या कंटेंट नियंत्रण पद्धती आणि तक्रार निवारण यंत्रणांवर लक्ष केंद्रित केले गेले आहे. हानिकारक ऑनलाइन कंटेंट, जसे की माहितीचे गैरसमज आणि द्वेषवाचन, वाढत असलेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, आयजीएपी चा अहवाल या प्लॅटफॉर्म्सवरील पारदर्शकतेतील प्रमुख कमतरता अधोरेखित करतो आणि भारतीय वापरकर्त्यांसाठी वाढीव उत्तरदायित्वाची मागणी करतो. या अभ्यासात युरोपियन युनियनच्या डिजिटल सेवांच्या कायद्यासारख्या आंतरराष्ट्रीय चौकटींसह तुलनात्मक विश्लेषण प्रदान केले गेले आहे आणि पारदर्शकता आणि अनुपालन पद्धती सुधारण्यासाठी उपयोगी शिफारशी सुचविल्या आहेत.

# ठाकरे गटात प्रवेश केलेले वसंत मोरेंचा पुढचा प्लॅन ठरला



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विधानसभा निवडणुकीचे वारं राज्यभरात वाहत आहे. महायुती, महाविकास आघाडी यांच्यासोबत मनसे, वंचित आणि तिसरी आघाडी निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. प्रत्येक पक्ष आपापला उमेदवार जाहीर करत आहे. त्यात भाजपा, मनसे, शिवसेना, राष्ट्रवादी अजित पवार गट, उद्धव ठाकरे गटानंतर आता शरद पवार गटाची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत पुण्यातील एका जागेचा समावेश आहे. पुण्यात हडपसर, खडकवासला आणि पर्वती हे 3 मतदारसंघ मविआत राष्ट्रवादीच्या वाट्याला आले आहेत. त्यात हडपसर येथून प्रशांत जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यात मागील निवडणुकीत मनसेकडून हडपसर विधानसभा निवडणूक लढणारे वसंत मोरे यांनी काही महिन्यांपूर्वी ठाकरे गटात प्रवेश केला होता. ते विधानसभा निवडणूक लढण्यास इच्छुक होते. मनसेतील गटबाजीला कंटाळून वसंत मोरे यांनी पक्षाचा राजीनामा दिला. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत मोरे यांनी महाविकास आघाडीकडून तिकीटासाठी प्रयत्न केले. परंतु मविआने आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी दिली. त्यावेळी वसंत मोरे यांनी कुठल्याही परिस्थितीत लोकसभा निवडणूक लढणार असा चंग बांधला. पुढे जात त्यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वात वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. पुणे लोकसभा निवडणूक वंचित बहुजन आघाडीच्या तिकीटावर वसंत मोरे यांनी लढवली. मात्र लोकसभा निवडणुकीत निवडणुकीत वसंत मोरेंचा पराभव झाला. त्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागलेले वसंत मोरे यांनी उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत मातोश्रीवर पक्षप्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून वसंत मोरे पुण्यातील खडकवासला मतदारसंघात निवडणूक लढण्यास इच्छुक होते. मात्र विधानसभेला हा मतदारसंघ राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला सोडण्यात आलेला आहे. याठिकाणी मविआकडून राष्ट्रवादीचे सचिन दोडके उमेदवारीचे प्रमुख दावेदार आहेत त्यामुळे या मतदारसंघात वसंत मोरे यांना तिकीट मिळण्याची शक्यता नाही.

> पुण्यातील हडपसर, खडकवासला आणि पर्वती हे तिन्ही मतदारसंघ राष्ट्रवादीच्या वाट्याला आल्याने याठिकाणी ठाकरे गटातील इच्छुकांचा हिरमोड झालेला आहे. त्यात खडकवासला येथील इच्छुक वसंत मोरे यांच्याशी लोकमत ऑनलाईननं संपर्क केला असता ते म्हणाले की, पक्षाचा जो आदेश असेल त्याप्रमाणे महाविकास आघाडीचं काम करावे लागेल. मी इच्छुक होतो पण पक्षाला जागा मिळाली नाही तर त्याला काय करणार..महाविकास आघाडीची काहीतरी स्वत:ची गणिते असतात. त्यामुळे ३ महिन्यात मीदेखील अपेक्षा करणे योग्य नाही. मला राज्य संघटकपदाची पक्षाने जबाबदारी दिली आहे ते काम सुरूच आहे. त्यामुळे विधानसभेचं काही वाटत नाही, काही महिन्यात महापालिका निवडणुका आहेतच. दक्षिण पुण्यातील कात्रज, धनकवडी, बालाजीनगर हा माझा प्रभाग आहे असं सांगत वसंत मोरे महापालिकेच्या तयारीला लागले आहेत.

## केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाचा पुणे महापालिकेला पुरस्कार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जल पुरस्कारामध्ये शहरी विभागात पुणे महापालिकेला तिसरा क्रमांक मिळाला आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार महापालिकेला देण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. राजेद्र भोसले, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी हा पुरस्कार स्वीकारला. गेल्या काही दिवसांपूर्वी पुणे महानगपालिकेला हा पुरस्कार जाहीर झाला होता. पुणे शहराच्या सर्व भागांमध्ये समान दाबाने आणि 24 तास पाणीपुरवठा व्हावा, यासाठी महापालिकेच्या वतीने समान पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. 2047 पर्यंतचा विचार करून, शहराची लोकसंख्या 50 लाख गृहीत धरून ही योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीनंतर शहरातील पाणी वितरणातील 40 टक्के गळती कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## *ओपनसिग्नल अनुसार एअरटेल ही महाराष्ट्रातील 5जी साठी सर्वात मोठी मोबाइल नेटवर्क सेवा पुरवठादार आहे*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारती एअरटेलने महाराष्ट्रातील प्रमुख 5जी नेटवर्क पुरवठादार म्हणून आपले स्थान अगदी भक्कम केले आहे, असे ओपनसिग्नलच्या ऑक्टोबर 2024 च्या अलीकडील मोबाईल नेटवर्क एक्सपीरियंस रिपोर्टमध्ये म्हटले गेले आहे.

या खूप मोठ्या टेलिकॉम कंपनीने 5जी व्हिडिओ एक्सपीरियंस, 5जी लाइव्ह व्हिडिओ एक्सपीरियंस, 5जी गेम्स एक्सपीरियंस, 5जी डाउनलोड स्पीड आणि 5जी अपलोड स्पीड सह पाचही प्रमुख नेटवर्क गुणवत्ता श्रेणींमध्ये बाजी मारली आणि या क्षेत्रातील 5जी सेवेसाठी अव्वल पसंती म्हणून आपले स्थान पक्के केले आणि आपल्या ग्राहकांना अतुलनीय कामगिरी प्रदान केली आहे. ओपनसिग्नल मोबाइल अनुभवांचे विश्लेषण करण्यासाठी एक जागतिक मानक असून खरा ग्राहक अनुभव समजून घेण्यासाठी एक निश्चित मार्गदर्शक आहे. ओपनसिग्नलने आपल्या ताज्या ग्राहक अहवालात, महाराष्ट्र क्षेत्रात एअरटेलच्या वर्चस्वाला मान्यता दिली असल्याने एअरटेलने अनेक निकषांमध्ये महत्त्वपूर्ण विजय मिळविला आहे, जसे की:

1. 5जी व्हिडिओ एक्सपीरियंस: एअरटेल एकसंध 5जी व्हिडिओ स्ट्रीमिंगसाठी महाराष्ट्रातील नंबर वन नेटवर्क आहे. एअरटेल वापरकर्त्यांना कोणताही अडथळा न जाणवता किंवा कोणत्याही बफरिंगशिवाय सर्वोत्कृष्ट व्हिडिओ अनुभवाचा आनंद उचलता येईल.
2. 5जी लाइव्ह व्हिडिओ एक्सपीरियंस: एअरटेलचे महाराष्ट्रातील 5जी नेटवर्क कमीतकमी विलंबासह सर्वोत्तम लाइव्ह व्हिडिओ स्ट्रीमिंग उपलब्ध करून देते. क्रीडा असो किंवा संगीत मैफिली असोत, वापरकर्त्यांना विनाव्यत्यय (लॅग शिवाय) वास्तविक सामग्रीचा (रिअल-टाइम कंटेंटचा) आनंद उचलता येतो. हे एअरटेलला व्यत्यय नसलेले लाइव्ह अनुभव देण्यात नंबर वन बनवते.
3. 5जी गेम्स एक्सपीरियंस: एअरटेलचे नेटवर्क कमी प्रमाणात सुप्त (लो लेटेंसी) असल्याने खेळ खेळणाऱ्या शौकिनांसाठी एक आरामदायी पर्याय बनवते. नेटवर्क विनाव्यत्यय अनेकजणांना एकत्र खेळू देण्याचा अनुभव देऊ करते आणि त्यामुळे त्यांना सर्व प्रकारांमध्ये सर्वोत्तम संभाव्य खेळण्याचा अनुभव मिळतो.
4. 5जी डाउनलोड स्पीड: एअरटेल ग्राहकांना महाराष्ट्रातील सर्वात वेगवान 5जी डाउनलोड स्पीडचा आनंद मिळतो, ज्यामुळे मोठ्या फाइल्स पटकन डाउनलोड करता येतात, अल्ट्रा-हाय डेफिनेशनमध्ये स्ट्रीमिंग करता येते आणि क्लाउडवर आधारित ॲप्लिकेशन्स लगेच उपलब्ध होतात.
5. 5जी अपलोड स्पीड: सामग्री अपलोड करायची असते तेव्हा, मग ते व्हिडिओ, दस्तऐवज किंवा लाइव्ह स्ट्रीमिंग असो, एअरटेल सर्वात वेगवान अपलोड स्पीड देऊन सगळ्यांमध्ये (पॅकमध्ये) आघाडीवर आहे आणि त्यामुळे निर्माते व ग्राहक दोघांसाठीही वापरकर्त्यांचा अनुभव वाढतो.

## मसालाकिंग धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.



'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करू शकणाऱ्या 3 गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, घराबाहेर किंवा प्रवासात प्राणवायू पुरवणारे पोर्टेबल ऑक्सिजन मशीन व ऑक्सिमीटर या उपकरणांचा समावेश होता.

याप्रसंगी बोलताना धनंजय दातार म्हणाले, "माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा ॲम्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करू न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत."

फुफ्फुसाच्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसन कार्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या डॉ. पूर्वी देवानी यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविकात त्या म्हणाल्या, "सकारात्मक दृष्टीकोण, योग्य उपचार, नियमित व्यायाम या जोरावर फुफ्फुसाच्या आजारांचे रुग्ण सर्वसाधारण आयुष्य जगू शकतात. आम्ही अशा रुग्णांचे समुपदेशन तथा यशस्वी पुनर्वसन करून त्यांना आनंदी जीवन जगायला शिकवतो."

# एचडीएफसी बँक ग्रुपने जाहीर केली एचडीएफसी टेक इनोव्हेटर्स २०२४ स्पर्धेच्या विजेत्यांची नावे

### स्टार्टअप परिसंस्थेशी संपर्क राखण्याच्या उद्देशाने राबवला जाणारा समूह स्तरीय उपक्रम




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एचडीएफसी बँक ग्रुपने एचडीएफसी टेक इनोव्हेटर्स-2024 स्पर्धेतील विजेत्यांची नावे जाहीर केली आहेत. एचडीएफसी टेक इनोव्हेटर्स - 2024 हा एचडीएफसी बँक ग्रुप कंपन्यांद्वारे संयुक्तपणे राबवला जाणारा उपक्रम आहे. एचडीएफसी एएमसी, एचडीएफसी एर्गो, एचबीडी फायनान्शिअल सर्व्हिसेस, एचडीएफसी लाइफ आणि एचडीएफसी सिक्युरिटीज या कंपन्या एचडीएफसी कॅपिटल व एचडीएफसी बँक यांच्या नेतृत्वाखाली, नवोन्मेषाला बढावा देण्याच्या तसेच तंत्रज्ञानाशी संबंधित स्टार्टअप व्हेंचर्सना संधी देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करतात. समूहातील प्रत्येक कंपनीने स्टार्टअप्ससोबत काम केले आहे, भागीदारी करार केले आहेत आणि ते दोन्ही बाजूंसाठी फलदायी ठरले आहेत.

एचडीएफसी टेक इनोव्हेटर्स हा उपक्रम एचडीएफसी कॅपिटलद्वारे अनेक वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या प्लॅटफॉर्मचा लाभ घेऊन स्टार्टअप परिसंस्थेसोबतचा संपर्क अधिक वाढवण्याचे काम करतो. तसेच व्यवसाय करण्याच्या, प्लॅटफॉर्म वाटून घेण्याच्या, कर्ज पुरवण्याच्या व गुंतवणूक करण्याच्या, सहअध्ययन सुलभ करण्याच्या आणि परस्पर सहयोगाने उत्पादने व सेवा विकसित करण्याच्या संधी दोन्ही बाजूच्या कंपन्यांना देतो. हा कार्यक्रम प्रथमच समूह स्तरावर आयोजित करण्यात आला. प्रॉपटेक, फिनटेक, सस्टेनिबिल्टी टेक, कंझ्युमर टेक आणि न्यू एज टेक अशा सर्व विभागांना यात सहभागी करून घेण्यात आले.

एचडीएफसी टेक इनोव्हेटर्स 2024 साठी पाच प्रवर्गांमध्ये 2,000हून अधिक अर्ज प्राप्त झाले. एचडीएफसी बँक समूहातील उच्चपदस्थ, व्हेंचर कॅपिटलिस्ट्स, उद्योगक्षेत्रातील ज्येष्ठ एग्झिक्युटिव्ह्ज आणि युनिकॉर्न संस्थापक यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेल्या मोठ्या परीक्षक मंडळाने या अर्जांमधून पहिल्या 10 विजेत्यांची निवड केली. निवडीच्या या प्रक्रियेचे व्यवस्थापन ईवायने केले. ऑल्ट डीआरएक्स प्रायव्हेट लिमिटेड, गरुडालिटिक्स प्रायव्हेट लिमिटेड, इंकर्स टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, इशित्व रोबोटिक सिस्टम्स, नॉश रोबोटिक्स, न्यूपेस रिसर्च अँड टेक्नोलॉजीज, वनस्टॅक सोल्युशन, क्वुनु लॅब्ज, रेपॉज एनर्जी इंडिया आणि व्हीएसओएफॉरयू टेक्नोलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड (यलोस्काय) या कंपन्या विजेत्या ठरल्या.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक पी. वासुदेवन या सोहळ्याला प्रमुख आतिथी म्हणून उपस्थित होते. आघाडीचे व्हेंचर कॅपिटॅलिस्ट्स, युनिकॉर्न संस्थापक, उद्योगक्षेत्रातील दिग्गज तसेच शिक्षणक्षेत्रातील मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते.

स्टार्टअप संस्थापकांच्या प्रेरणादायी प्रवासासंदर्भातील अनेक विषयांवर खिळवून ठेवणाऱ्या चर्चा या सोहळ्यात झाल्या. एचडीएफसी बँक समूहासारखे विशाल समूह स्टार्टअप्ससोबत काम कशा पद्धतीने करतात यावरही चर्चा झाली. एचडीएफसी बँकेच्या पेमेंट्स, लायबिलिटी प्रोडक्ट्स, कंझ्युमर फायनान्स व मार्केटिंग विभागांचे कंट्री हेड पराग राव; एचडीएफसी एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी नवनीत मुनोत; एचडीएफसी सिक्युरिटीजचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी धीरज रेली; एचडीएफसी लाइफच्या व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी विभा पडळकर; एचडीएफसी एर्गोचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अनुज त्यागी; फूड मार्केटप्लेस स्विगीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहित कपूर; झोहोचे सहसंस्थापक कुमार वेंबू; युअरस्टोरी मीडियाच्या संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रद्धा शर्मा; बिलडेस्कचे संस्थापक संचालक अजय कौशल; आणि अपग्रॅडचे सहसंस्थापक व व्यवस्थापकीय संचालक मयंक कुमार हे प्रमुख वक्ते होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.